**''प्रेस नोट''** **दिनांक १८/०३/२०२६**

# अरबी समुद्रातील ओ.एन.जी.सी.कंपनीच्या प्लॅटफॉर्मवर चोरी करणाऱ्या आरोपीतांचा शोध घेवुन अटक करण्यात यश

ओ.एन.जी.सी.कंपनीच्या अरबी समुद्रातील प्लॅटफॉर्मवर विविध साहित्याच्या चोरीच्या घटनेच्या अनुषंगाने यलोगेट पोलीस ठाणे येथे मार्च महिन्यात ०४ गुन्हे दाखल करण्यात आलेले होते. सदर गुन्हयात ओ.एन.जी.सी.च्या ०४ प्लॅटफॉर्मवरील बॅटरी बॅंक,सोलर पॅनल, केबल ई. साहित्य चोरीस गेल्याने गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदर गुन्हयाचे तपास करण्यासाठी पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ,मुंबई यांचेकडुन ०२ विशेष पथके स्थापन करून तपास करण्यात आला असता, त्यातील ०२ गुन्हे उघडकीस आले असुन सदर गुन्हयात ०३ आरोपीतांना विशेष पथकाने ताब्यात घेवुन अटक केली आहे. यातील अटक आरोपी पुढीलप्रमाणे-

१) चंद्रकांत धर्माजी पाटील , वय - ५३ वर्षे, व्यवसाय - मासेमारी बोट मालक, रा.ठि. फनस आळी, गोळीबार मैदान, क्रांती नगर , ता. पेन जि.रायगड, पिन कोड ४०२१०७.

२) संतोष कृष्णा पाटील, वय - ५० वर्षे, रा.ठि.राधा कृष्ण आळी, मु.पो. दादर, ता.पेन जि. रायगड.

३) विद्याधर गजानन म्हात्रे, वय- ३२ वर्षे, व्यवसाय - मजुरी, रा.ठि. वशेनी, ता.उरण, जि.रायगड.

सदर अटक आरोपीतांकडुन गुन्हयातील चोरीस गेलेल्या मालापैकी ४९ बॅटरी बॅंक, किं.अ. रू.१०,७०,०००/- हस्तगत करण्यात आले आहेत. तसेच सदर गुन्हयात वापरण्यात आलेली 'कौशल्याचा राम शक्ती' नावाची, रजिस्ट्रेशन क्रमांक- IND MH 7-MM-3676 असलेली जुनी वापरती मासेमारी बोट,किं.अं.रू. १५,००,०००/- सदर पथकाने ताब्यात घेतलेली आहे.

नमुद गुन्हयातील इतर पाहिजे आरोपीतांचा शोध विशेष पोलीस पथक घेत असुन अशा प्रकारे गुन्हा करणारे टोळीस ताब्यात घेवुन त्यांच्यावरती योग्य ती प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.

**सदरची कामगिरी मा. श्री. देवन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री.सत्यनारायण चौधरी, पोलीस सह आयुक्त (का.व.सु.), मा. श्री. अभिनव देशमुख, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ मुंबई, श्री.पंढरीनाथ पाटील, सहायक पोलीस आयुक्त, यलोगेट विभाग मुंबई, श्री. चेतन राठोड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यलोगेट पोलीस ठाणे, मुंबई. यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.रविंद्र मोहिते पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि धैर्यशील सोळंके , पोउपनि दत्तात्रय तोडकर , पो.ह.क्र.०६१८९७/ रणजित ठाकूर , पो.ह.क्र.०३०९४९ / वाडीले, पो.शि.क्र.९९०७१२/ सिकंदर डोलकर, पो.शि.क्र. १४०७५९/प्रविण बावा, पो.शि.क्र.१७०३६८/ योगेश पाटील,पो.शि.क्र.०९३३८०/ जमादार यांनी पार पाडलेली आहे.**